# मॅन्युअल -17

## 4 (1)(ब ) (Xvii)

विहित केलेली अशा प्रकारची अन्य माहिती

## प्रमुख लेखापाल (वित्त) खात्यात कर्मचारी / अधिका-यांच्या नियुक्तीसाठी अवलंबली जाणारी भरती प्रक्रिया

प्रमुख लेखापाल (वित्त) खात्यात "कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक" आणि "शिपाई" ही प्रथम नियुक्तीची दोन पदे आहेत.

1) कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक संवर्गाची प्रवेश पदे सार्वजनिक जाहिरातीद्वारे अर्ज मागवून / महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भरतीची सूचना देऊन, IBPS सारख्या बाहेरील व्यावसायिक संस्थांद्वारे किंवा सरळसेवा भरतीद्वारे भरली जातात. तसेच कामगार अधिकारी आणि संबंधित महानगरपालिका अधिका-यांनी मंजूर केलेल्या अनुकंपा/वारसाहक्क धोरणांतर्गत प्रकरणांतील उमेदवारांना नियुक्त केले जाते.
2) शिपाई संवर्गाची प्रवेश पदे कामगार अधिकारी आणि संबंधित महानगरपालिका अधिका-यांनी मंजूर केलेल्या अनुकंपा/वारसाहक्क धोरणांतर्गत प्रकरणांतील उमेदवारांमधून भरली जातात.
3) प्रमुख लेखापाल खात्यात पदोन्नतीच्या दोन साखळया आहेत –

   एक) कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक – वरिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक – लेखा अधिकारी – उप प्रमुख लेखापाल – प्रमुख लेखापाल

   दोन) शिपाई – नाईक – हविलदार – जमादार

   शिपाई – अभिलेख परिचर – अभिलेख सहाय्यक

वरील नमूद 'कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक' आणि 'शिपाई' संवर्गाच्या पदोन्नती साखळीतील पदोन्नतीची पदे कर्मचा-याने धारण केलेल्या पदावरील सेवाज्येष्ठता, पदोन्नती पदाकरिता विहित मंजूर अर्हतेनुसार कर्मचा-याची पात्रता, गोपनीय अहवालातील अभिप्राय विचारात घेऊन भरली जातात. याव्यतिरिक्त वरिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक पदावरील पदोन्नतीकरिता कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक संवर्गातील कर्मचा-यांना महानगरपालिकेची खात्यांतर्गत परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**खाते :- प्रमुख लेखापाल (वित्त)**

## दि. 24.01.2023 रोजीचा कार्यरत व रिक्त पदांचा अहवाल

| अनु.क्र. | पदनाम | कार्यरत पदे | कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली पदे | रिक्त पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रमुख लेखापाल | 1 | 0 | 1 | 2 |
| 2 | उप प्रमुख लेखापाल | 13 | 0 | 8 | 21 |
| 3 | चाचणी लेखा परिक्षा व दक्षता अधिकारी | 1 | 0 | 0 | 1 |
| 4 | लेखा अधिकारी | 96 | 0 | 14 | 110 |
| 5 | प्रशासकीय अधिकारी | 0 | 0 | 1 | 1 |
| 6 | वरिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक (अर्हताधारक) | 241 | 0 | 1 | 242 |
| 7 | वरिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक (अर्हतारहित) | 18 | 0 | 63 | 81 |
| 8 | कनिष्ठ लेखा परिक्षा व लेखा सहाय्यक | 865 | 0 | 175 | 1040 |
| 9 | वरिष्ठ अनुवादक | 0 | 0 | 1 | 1 |
| 10 | लघुलेखक (उच्च श्रेणी) | 2 | 0 | 1 | 3 |
| 11 | लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) | 1 | 0 | 7 | 8 |
| 12 | लिपिक | 3 | 0 | 23 | 26 |
| 13 | अभिलेख सहाय्यक | 0 | 0 | 1 | 1 |
| 14 | अभिलेख परिचर | 28 | 0 | 1 | 29 |
| 15 | जमादार | 2 | 0 | 0 | 2 |
| 16 | हविलदार | 2 | 0 | 1 | 3 |
| 17 | नाईक | 10 | 0 | 1 | 11 |
| 18 | शिपाई | 183 | 0 | 20 | 203 |
| 19 | कनिष्ठ बांधणीकार | 0 | 0 | 8 | 8 |
| 20 | हमाल | 2 | 0 | 2 | 4 |
| 21 | सरस लावणारा | 0 | 0 | 1 | 1 |
| | **एकूण** | **1468** | **0** | **330** | **1798** |

परिपत्रक क्र.एमबीसी/6257 दि.20.01.2020 अन्वये व.ले.प.व ले.स.(अर्हताधारक) संवर्गातील 2 , क.ले.प.व ले.स. संवर्गातील 5, अभिलेख सहाय्यक संवर्गातील 1 व नाईक संवर्गातील 1 कर्मचा-यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्याने त्यांचे पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.